# मेट्रो-३ ची आज चाचणी

मुंबई, ता. २९ : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या रेल्वेची चाचणी मंगळवारी (ता. ३०) घेण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) घेतला आहे. या पहिल्या मेट्रो रेल्वेच्या चाचणीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित असणार आहेत.

मेट्रो-३ चे कारशेड आरेमध्ये बनवण्याचे आदेश राज्य सरकारने दिल्यानंतर या प्रकल्पाला वेग आला आहे. आरेमध्ये कारशेड बनवण्यास पर्यावरण संघटनांकडून विरोध होत असतानाच मंगळवारी एमएमआरसीएलकडून मेट्रोची चाचणी घेण्यात येणार आहे. आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथे तयार करण्यात आलेल्या रेल्वेने १ हजार ४०० किमीचा पल्ला गाठत दोन टप्प्यांत मेट्रोचे आठ डबे मुंबईत दाखल झाले आहेत. मंगळवारी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेट्रो रेल्वेची चाचणी होणार आहे.v